# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :२/एनजीपीजीडीएमएलटी/२००३/ 6229

दिनांक : 18 ऑगस्ट 2003

प्रति,

प्राचार्य,

जीवनरेखा प्रतिष्ठानचे,

स्वामी विवेकानंद इंस्टिट्यूट ऑफ पॅरामेडीकल सायंसेस्,

अब्बास कॉम्प्लेक्स, अंबेजोगाई रोड, लातूर.

विषय- शैक्षणिक वर्ष २००३-२००४
विना अनुदान तत्वावर पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मेडीकल लॅब टेक्नॉलॉजी हा नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.

संदर्भः- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांकः मान्यता २००३/(१९६/०३)/ तांशि-२, दिनांक ९ जुलै २००३

उपरोक्त विषयाचे संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने शासनाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००३-२००४ पासून विना अनुदान तत्वावर पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मेडीकल लॅब टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम ३० प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे. सदर अटींपैकी आपण संयूक्त खात्यात रु. २.०० लाख स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, लातूर शाखा, येथे पावती क्रमांक एसपीएल/८-०१२००२३, दिनांक १४/७/२००३ अन्वये ५ वर्षे मुदतीसाठी नियतठेव म्हणून भरलेले आहेत. तसेच शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेला अभ्यासक्रम सन २००३-२००४ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मेडीकल लॅब टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता प्रत्येकी ३० पर्यंतच मर्यादित राहिल.

३. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/ तांशि-१ अ, दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.

४. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यांत यावे. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

२

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ ,बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीनें ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

७. शासन किंवा या संचालनालयाने किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांनी प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

८. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांच्याकडून घेतल्या जातील.

९. संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा,मुंबई, यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

१०. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

११. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई, यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१२. सदर अभ्यासक्रमाच्या मान्यतेसाठी यापुढे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विचार केला तर सदर अभ्यासक्रमास आपणांस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता घ्यावी लागेल व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता न मिळाल्यास सदर अभ्यासक्रम तात्काळ बंद करावा लागेल.

( प्रो. न. बा. पासलकर )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतः

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन पत्राचे संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
३. सचिव महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, औरंगाबाद
५. श्री.अे.एम.जाधव, सिस्टिम अॅनालिस्ट यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
६. कार्यासन क्र.१० यांना माहितीसाठी.
७. निवड नस्ती.